# हि र व ळ

# आ णि

# हो र प ळ

सु० म० त ड को ड

के दा र प्र का श न गृ ह

हिरवळ आणि होरपळ - सु० म० तडकोड
(ललितगद्य संग्रह)

HIRWALL ANNI HORPALL - BY S. M. TADKOD
(LITERARY ESSAYS)

ISBN 81 900262 - 3 - 2

सर्वाधिकार (C) प्रा० प्रियदर्शिनी सुधीर तडकोडकर

प्रथमावृत्ती : २००५ / विक्रम संवत् २०६२

मुखपृष्ठ : केदार - प्रियद

मुद्रण : ओमेगा ऑफसेट
४५७४, शेट्टी गल्ली, बेळगांव - ५९० ००१

प्रकाशक: केदारनाथ सुधीर तडकोड
केदार प्रकाशन गृह
१/बी, एस - ५, दुसरा माळा, कामत प्लाझा, सान्ता
इनेज, पणजी, तिसवाडी, गोवा - ४०३ ००१

वितरण व्यवस्था: प्रियद सुधीर तडकोड
प्रियद वितरण
१/बी, एस - ५, दुसरा माळा, कामत प्लाझा, सान्ता
इनेज, पणजी, तिसवाडी, गोवा - ४०३ ००१

मूल्य : रुपये १६५/-

# हिरवळ आणि होरपळ

**डॉ०** सु० म० तडकोडकर ललित लेखन करीत असताना *सु० म० तडकोड* हे कविनाम धारण करतात म्हणून या प्रस्तावनेच्या निमित्ताने येथे सु० म० तडकोड याच कविनामाचा उल्लेख करणार आहे. उत्कट आत्माविष्कारासाठी कवितेसारखा वाङ्मयप्रकार समर्थपणे वापरणाऱ्या कवी सु० म० तडकोड यांचा ललित गद्यातूनही स्वत:ला व्यक्त करण्याचा सुंदर आणि यशस्वी प्रयत्न म्हणजे *हिरवळ आणि होरपळ* हा ललित लेखांचा संग्रह होय. माणसाची घडण आयुष्यातील अनंत घटना-प्रसंग, व्यक्ती, स्थळे, वस्तू, वास्तू, संस्कार, भावानुभव, विचार यांतून होत असते. मानवी अस्तित्वाचा ते अभिन्न भाग बनलेले असतात. तडकोड आपल्या अस्तित्वाचा भाग बनून राहिलेल्या अशा काही वेचक गोष्टींचा, क्षणांचा वेध आपल्या विविध निबंधांतून घेतात आणि या गोष्टींशी असलेला भावनात्मक व वैचारिक पातळीवरील आपला आन्तरिक अनुबन्ध सूक्ष्म आणि तरल पातळीवर व्यक्त करतात. प्रकारदृष्ट्या कोणत्याही एकाच रूढ साच्यात बसू न शकणाऱ्या या निबंधांची आशयदृष्टया विविधता व व्यापकता सकृतदर्शनीच वाचकांचे लक्ष वेधून घेते. आपल्या आयुष्यातील दूरस्थ भूतकाळापासून ते वर्तमान वास्तवापर्यन्त, प्रेमळ सुहृदांपासून ते साहित्यविश्वातील नामवंतांपर्यन्त, रवीन्द्रनाथांच्या शान्तिनिकेतनापासून ते स्वत:च्या नगरात अस्ताव्यस्तपणे वाढत जाणाऱ्या वस्तीपर्यन्त, लोकसाहित्यापासून ते प्रवासवर्णनात्मक साहित्यापर्यन्त आणि पिंगळ्यासारख्या पक्ष्यापासून ते *म्यॉंव म्यॉंव* असे म्हणत तक्रार करणाऱ्या घरच्या मांजरापर्यन्त अनेकविध विषयांना या निबंधांतून लालित्याचा स्पर्श झाला आहे.

कधी स्वत:च्या भूतकाळात हरवलेला लेखक आई-वडीलरूपी कल्पवृक्षाच्या छायेत गेलेले बालपण आयुष्याने दिलेले अमोल दान म्हणून जपत राहतो, तर कधी आपल्या आयुष्याच्या घडणीत "उत्तम बीज पेरणारे कृषक" म्हणून शिक्षकांनी केलेल्या कार्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करतो. बालपणी बेहोष होऊन ऐकलेल्या *सोमार*च्या भजनातील स्वरांचा ओला झुला लेखकाच्या मनाला आजही आन्दोलित करीत राहतो. भूतकाळात हरवण्याची ही स्मरणरमणीयता म्हणजे जरा-मरणाला थांबविणारा चाळा असे लेखकाला वाटते. सॉंची किंवा शान्तिनिकेतन यांचे आजचे स्वरूप पाहून उद्विग्न आणि हतबुद्ध झालेल्या लेखकमनाचे दर्शन वाचकांनाही अस्वस्थ करते. शान्तिनिकेतनच्या रूपाने रवीन्द्रनाथांनी उभे केलेले, मानवी संवेदनशीलतेचे सौन्दर्य जोपासणारे स्वप्न आज कसे आगीवाचून होरपळत आहे, उध्वस्त होत आहे हे लेखकाने मोठ्या पोटतिडिकेने सांगितलेले आहे आणि आजच्या संस्थात्मक जीवनाविषयी वाचकांनाही पुनर्विचार करायला लावलेला आहे.

तडकोडांच्या आयुष्यात आलेल्या कविवर्य शंकर पाण्डुरंग रामाणी डॉ० सुरेश रामकृष्ण चुनेकर या वाङ्मयीन क्षेत्रातील दिग्गजांविषयीचे या संग्रहातील निबंध महत्त्वाचे असून ते त्यांच्या कर्तृत्त्वाचे आणि व्यक्तित्त्वाचे दर्शन या निबंधांतून प्रभावीपणे घडवितात. रामाणी या मनस्वी कवीचे दर्शन घडविणारा लेख व्यक्तिदर्शनात्मक ललितनिबंध म्हणून आकर्षक ठरलेला आहे. आठवणी आणि पत्रव्यवहार यांमधून एक कवी आणि एक माणूस म्हणून वाचकांना अनोखे वाटेल असे रामाणींचे चित्र या निबन्धातून प्रभावीपणे उभे राहते. रामाणींच्या सान्निध्यात कवीपेक्षाही आपण एक तपस्वी पाहिल्याचे समाधान लेखकाला

अधिक महत्त्वाचे वाटते. पत्रलेखनाची भाषा आणि आकलन करून घेण्याची भाषा यांचा मनोहर संगम या निबन्धात दिसून येतो.

कविवर्य रामाणींप्रमाणेच पत्रांतून उलगडत जाणारे डॉ० चुनेकरही वाचकांच्या चित्तात रिघत जातात. मौज सम्प्रदायाशी जवळकीचे नाते असूनही कुठल्याच वाङ्मयीन गटाची मुद्रा स्वत:वर बसू न देणारे चुनेकर, त्र्यं० वि० सरदेशमुख किंवा वा० ल० कुळकर्णी यांच्या समीक्षेविषयी आपल्या पत्रांतून जी प्रतिक्रिया व्यक्त करतात, त्यातून साहित्याचे साक्षेपी अभ्यासक म्हणून त्यांची ओळख पटते. समीक्षक म्हणून स्वत:चा वेगळी नाममुद्रा उमटविणारे चुनेकर संवेदनशील कवीही आहेत, या वस्तुस्थितीचे प्रथमच उद्घाटन होते. तडकोडांना प्रभावित करणारे साहित्याचे अभ्यासक म्हणून चुनेकरांचे दर्शन जसे या निबंधातून घडते त्याचप्रमाणे भोवतालच्या मूल्यविहीन व्यवहारी जगाच्या अनुभवाने अस्वस्थ झालेला. पण जीवनाविषयी कधीही नकारात्मक विचार न करणारा एक माणूस म्हणूनही तडकोडांना त्यांचे जाणविलेले रूप या निबन्धाला विलोभनीय बनविते.

रा० भि० जोशी हे मराठीतील एक शैलीदार प्रवासवर्णनकार! तडकोडांना जोशींनी गोव्याविषयी लिहिलेल्या प्रवास-लेखांवर आधारलेला स्वतंत्र निबंध आवर्जून लिहावासे वाटते, यातून त्यांच्यातील अस्सल गोमंतकीयत्त्वाचा प्रत्यय येतो. गोव्यातील मन्दिरे आणि भव्य निवासस्थाने रा० भिं० ना कशी आवडली, हे सांगतानाच वेगवेगळ्या कालखण्डांत गोव्यातील घरबांधणीचे स्वरूप कसे परिवर्तीत होत गेले याची उद्बोधक माहितीही ते देतात. ते रा० भिं०च्या अभिजात रसिकवृत्तीला दाद देताना रा० भिं०च्या मनातील गोवा आणि आजच्या वास्तवात परिवर्तीत होणारा गोवा या स्थित्यंतराबद्दल स्वत:ची हुरहूरही व्यक्त करतात.

वाढत्या वस्तीच्या आक्रमणामुळे गोमंतकीयांच्या *सुशेगाद* अस्तित्त्वाला कसा धक्का बसतोय हे "छावणी झुलते आहे" या निबंधातून प्रभावीपणे सांगितले जाते. आपला आवडता पक्षी म्हणून दिमाखसुन्दर पिंगळ्याशी लेखक संवाद साधतो तेव्हा त्यांची सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि चिन्तशीलता वाचकांना प्रभावित करते, तर उमलता उमलताच कोमेजलेल्या कळीच्या - अनघाच्या - वर्णनातील लेखकाची भावव्याकुळता वाचकांच्या हृदयालाही स्पर्श करून जातो. "मनातले थबकणे...क्षणभर..." या शीर्षकाखाली लिहिलेले स्फुटनिबन्ध म्हणजे ललितनिबन्धाच्या शैलीची वैशिष्ट्यपूर्ण उदाहरणे म्हणावी लागतील. येथे कधी ऐकणाऱ्याचे प्राण व्याकूळ करणाऱ्या *यानी*च्या संगीतरचनांच्या परिणामाचे हळूवार वर्णन येते तर कधी "आपण लिहितो कुणासाठी?" या नेहमीच्याच प्रश्नाचा काही वेगळा वेध घेतला जातो. हसणे, भेट होणे, स्पर्श करणे, तक्रार करणे या मानवी जीवनातील नेहमीच्याच कृती लेखकाच्या मनातील भावानुभवाचा आणि चिंतनाचा भाग बनलेल्या जशा दिसतात त्याचप्रमाणे नेहमीच कशाचा तरी वेध लागलेली किंवा पत्राच्या प्रेमात बुडालेली माणसे लेखकाच्या कौतुकाचा विषय बनलेली दिसतात. साध्या वाटणाऱ्या विषयातून सूक्ष्म आणि सखोल आशयाचा शोध घेताना लेखक येथे अनेकदा सहजपणे काव्यात्म पातळीवर गेलेला दिसतो.

जीवनाच्या नानाविध अंगाने शोध घेणाऱ्या तडकोडांच्या या निबंधांची आशयदृष्ट्या असणारी विविधता आणि त्यातील चिंतनशीलता जशी महत्त्वाची आहे तशी रचना किंवा

शैलीदृष्ट्याही या निबंधांची विविधता लक्षवेधक ठरते. "दोन मस्त बैल आणि बेडूक" या सारख्या रूपककथेतून कधी जीवनसत्य सांगितले जाते तर कधी दोन मित्रांमधील संवादाच्या माध्यमातून विशिष्ट वास्तवावर भाष्य केले जाते. काही निबन्धांना उत्तम व्यक्तिचित्रणाचे स्वरूप आलेले दिसते तर काही उत्कृष्ट शब्दचित्रे ठरतात. काही निबंध वाङ्मयीन अवलोकनात्मक व समीक्षेच्या पातळीवर गेलेले आहेत तर काहीमध्ये आत्माविष्कार अधिक प्रभावी ठरलेला आहे. निबन्धांच्या या रूपवैविध्याला भाषेच्या विविधांगी आविष्काराचे परिमाण आहेच. जीवनवास्तवाच्या अप्रिय बाजूंवर भाष्य करतान लेखकाची भाषा स्पष्ट, रोखठोक झालेली दिसते तर जीवनविणीचे सूक्ष्म धागे उलगडताना ती हळूवार, काव्यात्म बनलेली दिसते; कधी भावोत्कट तर कधी चित्रदर्शी होते. चिन्तनगर्भ आशयाला सामावून घेताना ही भाषा कधी कधी सुभाषितात्मक विधानांच्या पातळीवरही जाते. अस्सल कोंकणी तसेच संस्कृत आणि इंग्रजी शब्दांचा आशयानुसार नेमकेपणाने केलेला वापर या निबन्धांच्या भाषाविष्काराला व्यामिश्र पण सुन्दर स्वरूप प्राप्त करून देतो.

हे निबन्ध वाचताना जीवनाच्या विविधांगी दर्शनाबरोबरच वाचकाला लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचीही जवळून ओळख होते. उपनिषदांपासून ते लोकसाहित्यापर्यन्त आणि केशिराजाच्या "दृष्टान्तपाठा"पासून ते आर्यविङ्ग स्टोनच्या "द ॲगनी ॲण्ड एक्स्टसी"पर्यन्त नानाविध सन्दर्भांना स्वतःच्या लेखनात सहजपणे सामावून घेणाऱ्या लेखकाची बहुश्रुतता जशी जाणवते त्याचप्रमाणे मायकेल ॲंजेलो, व्हिन्सेण्ट व्हॉन गॉफ, बौद्ध शिल्पकार आणि *यानी*सारख्या कलावंतांवर असीम (तडकोडांनी स्वतःच्या एका मित्राच्या पणजीच्या निकट असलेल्या दोना पॉवला येथील समुद्रकिनाऱ्यावर बांधलेल्या नव्या वास्तूला "असीम" असे नाव दिले आहे.) प्रेम करणाऱ्या लेखकाच्या कलाप्रेमाचा आणि रसिकतेचाही प्रत्यय येतो. त्यांच्या निसर्गप्रेमाचा पडताळा मी स्वतःच घेत असतो. तडकोडांनी कोणत्याही प्रकाराचा गाजावाजा न करता गोवा विद्यापीठाच्या प्रागंणात शिरिषाची तसेच अन्य कित्येक प्रकारची झाडे लावली आहेत अन् इतरांच्या अवकृपेचा त्यांना वारा लागू न देता ती वाढविलीही आहेत. त्यांच्या अशा स्वभावाचे प्रत्यंतर त्यांच्या लेखनातही ठसठशीतपणे उठून दिसते. गुणग्राहकता, चिन्तनशीलवृत्ती, भावकोमलता, या गुणांबरोबरच केवल भावूक न होता जीवनाचे आकलन करण्याची लेखकाची परखड वास्तवदर्शी जीवनदृष्टीही या निबन्धांतून प्रभावीपणे व्यक्त होते.

जीवनातील होरपळीपेक्षा हिरवळीच्याच अनुभवाचा सुखद प्रत्यय प्राधान्याने देणारे आणि लेखकाच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे रंग घेऊन व्यक्त झालेले ललित गद्य आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटविल्याशिवाय राहत नाही.

वरिष्ठ प्रपाठक, **- डॉ० वासुदेव दत्तात्रय सावन्त**
मराठी पदव्युत्तर आणि संशोधन विभाग, गोवा विद्यापीठ,
ताळगांव पठार, तिसवाडी, गोवा - ४०३ २०६